Chairman
**Vidyadhar Anaskar**
M.Com., D.T.L., D.L.L. & L.W., LL.B.

Vice Chairman
**Ramakant Khetan**
B.Sc., LL.B.

Chief Executive & Secretary
**Sou. Sayali Bhoir**
B.Com., G.D.C. & A., LL.B., C.A.I.I.B

**The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.**
(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March 1979)
Bharatiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai - 400 031. P. B. No. 7120,
Tel. : 022 - 2413 5797, Fax : 022 - 2415 1185
E-mail : admin@mucbf.com ● www.mucbf.com

७५ /नागरी बँक वार्तापत्र/ २०१७-१८
दि.९ मे,२०१७

**प्रति,**
**मा.अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व नागरी सहकारी बँका
महाराष्ट्र राज्य.

विषय: **नागरी बँक वार्तापत्रासाठी माहिती पाठविणेबाबत.**

**महोदय,**

आपणांस माहीत आहेच की, फेडरेशन प्रसिध्द करीत असलेले महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँकांसाठीचे एकमेव **'नागरी बँक'** वार्तापत्र सभासद नागरी सहकारी बँकांना /असोसिएशन्स् यांना विनामुल्य पाठविण्यात येत असते. या वार्तापत्रात भारतीय रिझर्व्ह बँकेची परिपत्रके, सहकार खात्याची परिपत्रके, महाराष्ट्र शासनाचे अध्यादेश, शासन निर्णय, भारत सरकारची राजपत्रके, नागरी सहकारी बँकांना येणाऱ्या अडचणींचे, न्याय-निवाडासंदर्भातील किस्से, सभासद बँकांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी उच्च पातळीवरील मान्यवरांच्या भेटींचा वृत्तांत, भारतीय रिझर्व्ह बँकेशी होणाऱ्या वार्षिक आर्थिक पतधोरण सभांचा आढावा, टॅफकबमधील सभासद बँकांनी घ्यावयाची दक्षता व मार्गदर्शन, सभासद बँकांनी केलेल्या कामगिरीचा गौरव वृत्तांत, सहकारी बँकांतील मान्यवरांचा अभिनंदनपर उल्लेख, बँकिंग क्षेत्रातील ताज्या घडामोडी इ.बाबत अद्ययावत माहिती आवर्जून प्रसिध्द करण्यात येत असते.

या पार्श्वभूमीवर आपणांस कळविण्यात येते की, आपल्या बँकेच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाने बँकेत कार्यरत असताना बँकेचा नावलौकिक वाढविण्याच्यादृष्टीने प्रामाणिकपणे व कुशलतेने केलेली अविस्मरणीय कामगिरी, अकस्मात घडलेल्या घटनांमध्ये तसेच फसवणूक प्रकरणांची कर्मचारी/अधिकारी वर्गाने चातुर्याने केलेली उकल व त्याची बँकेने घेतलेली दखल, तसेच संस्थेमध्ये कार्यरत असताना कला, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रात मिळविलेले प्राविण्य, पुरस्कार इ.ची माहिती फेडरेशनकडे पाठविण्यात यावी, जेणेकरुन फेडरेशनच्या 'नागरी बँक वार्तापत्रात' संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या नामोल्लेखासह सदर माहिती प्रसिध्द करता येईल.

कळावे.

आपली विश्वासू

**सौ.सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव